

संत शिरोमणी
रविदास महाराज

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई-मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM



आशिर्वाद

मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com वर्ष : १, अंक : ६, फेब्रुवारी २०२१, पाने : ४ संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे


**जा देखे घनि उपजै, नरक कुंड में बास**
**प्रेम भगति सों ऊधरे, प्रगटत जन रैदास**

ज्या रविदासांना पाहून लोकांना घृणा यायची, ज्या रविदासांचे वास्तव्य स्थान हे नरक कुंडासमान वाटायचे, त्याच रविदासांना इश्वरभक्तीत लीन झालेलं पाहून रविदासांचा मानवजातीत पुन्हा नव्याने जन्म झाला, असेच मानावे लागेल.



# राष्ट्रीय संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती महोत्सव जल्लोषात साजरा करा!

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या सर्व जिल्हाध्यक्षांना मा. बबनराव घोलप यांचा आदेश

**नाशिक (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती २७ फेब्रुवारी २०२१ रोजी आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या सर्व जिल्हाध्यक्षांना महासंघाच्या वतीने सूचित करण्यात येत आहे की, दि. २७ फेब्रुवारी ते २७ मार्च २०२१ या कालावधीत आपापल्या जिल्ह्यात / तालुक्यात व शहरात सर्व वरिष्ठ /कनिष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन मोठ्या उत्साहात/जल्लोषात जयंती महोत्सव साजरा करावा.

संतांचे संत गुरू रविदास महाराज यांची मानवतावादी शिकवण समस्त समाजात रुजवावी. तसेच त्या निमित्ताने आपला समाज बांधव संघटित करावा.

प्रत्येकाने आपला अहंकार व वैयक्तिक हेवेदावे बाजूला ठेवून संत रोहिदास जयंती निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावे. असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष मा. बबनरावजी घोलप यांनी एका जाहिर प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# मुंबईत बोरिवली कोर्टात कार्यरत चर्मकार समाजबांधव ॲड. सिद्धांत सरोदे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन



**मुंबई (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, चर्मकार हृदयसम्राट तसेच क्रांतिकारी नेते मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या आदेशाने चर्मकार समाजाचे सुपुत्र ॲड. सिद्धांत सरोदे यांच्या वकिली व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन प्रसिद्ध कवी, लेखक, संपादक, आर्किटेक्ट, बिल्डर, समाजसेवक व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. शांताराम कारंडे यांच्या शुभहस्ते मंगळवार दि. २६ जानेवारी २०२१ रोजी करण्यात आले. सदर प्रसंगी सौ. संगीता कारंडे, संदीप लिंगायत, श्री. दीपक सोनकांबळे, ॲड. कुणाल नाईक, प्रा. भरतकुमार खैरनार, ॲड. कृष्णा कंबळे, ॲड. प्रदीप कुमार विश्वकर्मा व ॲड. सचिन चव्हाण इ. मान्यवर उपस्थित होते.ॲड. सरोदे यांना कार्यालयातील साहित्य व कॉम्प्युटर डॉ. कारंडे यांच्यातर्फे मोफत देण्यात आले होते. आपला समाजबांधव शिकून मोठा होऊन त्याने स्वत:चा व्यवसाय करावा या हेतूने ही मदत केली होती असे प्रतिनिधींशी बोलताना डॉ. कारंडे यांनी त्यावेळी सांगितले.



# जीवनाधार फाऊंडेशनच्या 'मुंबै महोत्सवा'त डॉ. शांताराम कारंडेंचा सन्मान

**मुंबई (प्रतिनिधी) :** जीवनाधार फाउंडेशन आयोजित मुंबै महोत्सवात खासदार श्री. गोपाळ शेट्टी, मा. आमदार श्री. अशोक भाऊ जाधव, प्रख्यात पार्श्वगायिका श्रीम. पुष्पा पागधरे, अभिनेत्री अलका कुबल, अभिनेत्री आयेशा झुलका, अभिनेते विजय पाटकर, प्रसिद्ध गायक दादूस, उथड हायस्कुल व कॉलेजचे मालक प्रिं. अजय कौल, जीवनाधार फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. राजेश खाडे, सरचिटणीस सौ. अनिता खाडे, नगरसेविका सौ. प्रतिमा खोपडे, दत्तासेवा पतपेढीचे अध्यक्ष श्री. आनंद माईंगडे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रसिद्ध समाजसेवक डॉ. शांताराम कारंडे यांना सन्मानित करण्यात आले

## संपादकिय

### राजकीय विचार जरी वेगवेगळे असले तरी शिखर संघटना एकच असावी!

राष्ट्रीय चर्मकार महासंघ व शिखर संघटना १९९५ पासून राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही संघटना देशात व महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत आहे व या संघटनेचे काम महाराष्ट्राचे प्रत्येक गावपातळीपर्यंत पोहोचले असून काही राज्यात काम चालू असून कार्यकर्ते आहेत, याची कल्पना संपूर्ण समाज बांधव व भगिनींना ज्ञात आहे, समाजातील काही समाज हितचिंतक समाज बांधव समाज एकसंघ यावा या साठी मनापासून प्रयत्नशील आहेत,त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो एकीचा बळ काय असते याची पुर्ण कल्पना त्यांना आहे व हे १००% टक्के त्यांचे म्हणणे बरोबर आहे, कारण आपला समाज तुटपुंजा आहे व त्यात तो सर्व पक्षात विखुरलेला आहे. त्यामध्ये तो अनेक संघटनेत काम करतो, राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही एक अशी संघटना आहे की,यात सर्व पक्षात काम करणारे कार्यकर्ते आहेत,कारण आम्ही प्रथमा पासूनच अराजकीय सामाजिक संघटना म्हणून धोरण अंगीकारले आहे,आणि आजपर्यंत आमच्या नेते मा.बबनराव घोलप यांनी ते पाळले आहे,म्हणूनच ग्राम पंचायत पासून ते खासदार पर्यंत समाज बांधव निवडून आले आहे, आमची राष्ट्रीय चर्मकार महासंघ ही संघटना कायम समाज बांधव उमेदवारांचे पाठी ऊभी राहिली आहे.काही दिवसापूर्वी वॉट सॉप गृपवर जवळ जवळ ३१ संघटनांचे नावे आली होती व त्यांची एक शिखर संघटना असावी असे काही मंडळीचे मत आहे, कल्पना चांगली आहे परंतु त्या मधील बर्याच संघटना ह्या राष्ट्रीय चर्मकार महासंघ या संघटनेतून बाहेर पडून नव्याने स्थापन झालेल्या असल्याचे मला दिसून आले आहे.

समाजातील मा.अशोकजी लहाने व मा.ॲड. नारायणराव गायकवाड यांची समाज संघटीत करण्याची तळमळ व धडपड पहाता खरोखर समाज बांधव यांचे प्रश्न सुटण्यासाठी त्याचा चांगलाच उपयोग होणार आहे,यात तिळमात्र शंका नाही. पण यापूर्वी देखील चर्मकार समाजाला संघटीत करण्यासाठी चर्मकार ऐक्य परिषदेचा प्रयोग झाला,आणि तो पुर्णपणे फसला गेला त्याचे एकमेव कारण म्हणजे स्वार्थी नेतृत्व, इतरांपेक्षा मीच खरा समाजाचा नेते

मलाच अध्यक्षपद मिळाले पाहिजे, ही महत्वकांशा त्यामुळे त्या ऐक्य परिषदेचा पुरता खेळखंडोबा झाला याची कल्पना संपूर्ण समाज बांधव यांना आली आहे, म्हणून चर्मकार संघटनांची शिखर संघटना करतानी काही तरी घटना तयार करावी. काही ठोस कार्यक्रम ठरवावा व तो निश्चित करून शिखर संघटना करावी. थोडा उशीर झाला तरी हरकत नाही,जर पुन्हा ऐक्य परिषदे सारखी अवस्था झाली तर समाजाचा कोणत्याही संघटने वरचा विश्वास राहाणार नाही.

ज्या संघटना या शिखर संघटनेट सहभागी होतील त्यांना शिखर संघटनेने केलेले नियम व अटी.बंधनकारक राहतील शिखर संघटनेचे नेतृत्व हे संयमी वेळ देणारे व सर्व समावेशक असावे त्या नेतृत्वाचा सर्व संघटनांनी आदर करावा,त्या नेतृत्वाचा महाराष्ट्र राज्य व देशभर फिरण्याची तयारी आसली पाहिजे, त्या नेतृत्वाजवळ समाजाला दिशा देण्याची क्षमता असावी त्या नेतृत्वाला महाराष्ट्रातुन सर्व समाजाचा व सर्व संघटनांचा पाठीबा असणे आवश्यक आहे, ह्या शिखर संघटनेत सर्व जिल्हात असणार्या सर्व लहान मोठ्या संघटनांचा शोध घेऊन त्यांना देखील प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे,हे सर्व करत असताना प्रत्येकाने आपण ज्या पक्षात काम करीत असाल तर शिखर संघटनेत येतांना पक्षाची झुल काढून ठेवली पाहिजे,शिखर संघटनेत तन मन व धन लाऊन काम करणारे नेतृत्व पाहिजे.या सर्व बाबींचा विचार करून एकच शिखर संघटना असावी याला आम्ही सहमत आहोत.



**पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार
राष्ट्रीय चर्मकार महासंघ

■ 98202 58049

‘खच्चीकरण’ करण्यात तसा कुणाचा वाईट हेतू असेल, असेही नसते. कारण ज्याचे खच्चीकरण केले जात असते त्याच्या तोंडावर व समक्ष त्याच्या विरोधात बोलण्याची कुणाची हिंमत नसते, परंतू कुरघोडी करून, त्याला आपल्यापेक्षा कमीपणा कसा आणता येईल याच विचारात ‘खच्चीकरण’ करणारे वावरत असतात.

# खच्चीकरण !!



**एखादा व्यक्ती त्याच्या बुद्धिमतेच्या जोरावर, ताकतीच्या जोरावर किंवा त्याच्या हिंमतीच्या जोरावर एकामागुन एक यशाची शिखरे पार करू लागला असेल तर फक्त त्या ईर्षे पोटी, द्वेषापोटी, किंवा स्वतःचा जळफळाट होतोय तो शमविण्यासाठी त्या व्यक्तीचे कारण नसताना उगीचच केले जाते ते खच्चीकरण!**

एखाद्याचे खच्चीकरण करणे म्हणजे अर्थातच त्याला कोणत्याना कोणत्या तरी कारणाने मागे खेचणे, त्याच्या मार्गात मुध्दामहून अडथळा आणणे किंवा त्याच्या कामात व्यत्यय कसा येईल या विचाराने त्याचे मानसिक संतुलन बिगडवणे होय. परंतू एखादा मुरलेला राजकरणी स्वतःचे खच्चीकरण होताना पाहत अगदी सयंम बाळगून शांत राहतो व त्याचा दिवस उजाडताच तो असा काही चौकार किंवा षटकार मारतो की होणारे खच्चीकरण अचानक सन्मानात रूपांतरीत होते. परंतू त्याची सुद्धा वेळ येण्याची तो देखील वाट पाहत असतो.



**आर या पार**
डॉ. शांताराम कारंडे

मुळात कुणाचेही ‘खच्चीकरण’ कुणीही का करावे ? कधी कधी वाटतं की काही लोकांची वृत्ती नकारात्मक असल्याने त्यांना सकारात्मक गोष्टी पाहण्याची सवय नसते, त्यामुळे कुणी सकारात्मक कार्य करत असेल तर उगीचच त्याच्या कार्यात अडथळा आणला जातो. ज्या गोष्टींना व्यवहारात काहीच किंमत नसते अशा गोष्टींचा बाऊ केला जातो. त्या गोष्टीवर नाहक विरोधाभास निर्माण करून वेगवेगळ्या स्टाईलने रंगवल्या जातात ज्या व्यक्तींचे खच्चीकरण केले जाते त्या व्यक्तीशी इतर अन्य जण तात्विक चर्चा करण्यास असमर्थ असल्याने मग तांत्रिक गोष्टींचा भडीमार केला जातो. ज्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत इतर काह जे करीत असतात मग ते स्वतः वेगवेगळ्या मतांचे असून सुद्धा फक्त एकाच्या खच्चीकरणासाठी एकमतावर येतात.पुढे त्यांचे काय होणार हे सांगण्यासाठी कोणत्या ज्योतिषाची गरज नसते.

‘खच्चीकरण’ करण्यात तसा कुणाचा वाईट हेतू असेल, असेही नसते. कारण ज्याचे खच्चीकरण केले जात असते त्याच्या तोंडावर व समक्ष त्याच्या विरोधात बोलण्याची कुणाची हिंमत नसते, परंतू कुरघोडी करून, त्याला आपल्यापेक्षा कमीपणा कसा आणता येईल याच विचारात ‘खच्चीकरण’ करणारे वावरत असतात. त्यांच्या स्वतःच्या नजरेत ते अगदी योग्य असतात कारण उजव्या डोळ्यावर मारलेली पट्टी त्यांना आरशामध्ये डाव्या डोळ्यावर मारलेली दिसते. आपण बेंबीच्या देठापासून ओरडून सांगितले तरी त्यांचा त्या आरश्यावरच भरोसा असतो. एखादी गोष्ट नक्की ‘चूक’ आहे की ‘बरोबर’ हे तपासून घेण्यापेक्षा, सत्याला खरी साथ देण्यापेक्षा लोक काय म्हणतात किंवा म्हणतील या विवंचनेत ते आपल्याच जवळच्या माणसाला हृदयातून दुखावतात. ‘खच्चीकरण’ करणे ही तशी एक प्रकारची विकृतीच आहे. प्रकृती मध्ये कुणीही कुणाचे ‘खच्चीकरण’ करत नसतो तर उलट मोठेपणा देत असतो. एखादा दहा रुपयांचे काम करत असेल तर मोठेपणा देताना त्या कामाचे शंभर रुपये सांगितले जातात. तर उलट ‘खच्चीकरण’ करणारे त्याच कामाला एक रुपयाची सुद्धा नव्हे तर एक पैशाची देखील किंमत दयायला तयार नसतात. एखाद्याला मोठेपणा देणं किंवा त्याचं ‘खच्चीकरण’ करणं हे सर्वस्वी कुणाच्याही प्रकृतीवरच अवलंबून असतं. ज्यांची प्रकृती ठीक नसते तेच लोक विकृत होऊन खच्चीकरण करत राहतात. समाजामध्ये वावरताना प्रत्येकाला यशाच्या शर्यतीती भाग घेऊन जिंकायचं असतं. त्यामुळे जो – तो आपापल्या क्षमतेने क्षमतेने कुवतीनुसार धावत असतो. ज्यांच्या मध्ये शर्यत जिंकण्यासाठी लागणारी क्षमता नसते तेच लोक मग स्वतः जलद गतीने धावून जिंकण्यापेक्षा उगीचच आपल्या बरोबर धावणाऱ्या सहकाऱ्याच्या पायात पाय अडकवून पडण्याचा प्रकार म्हणजेच एकप्रकारचे ‘खच्चीकरण’ करणे होय.

मोबाईल नं. ९८२०१ ५८८८५
dr.shantaramkarande@gmail.com

संपादक मंडळ

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई-मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई- ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)




**अमरावती (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील नवनियुक्त ग्राम पंचायत सदस्या सौ. प्रितीताई बुंदीले यांचा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने निलेश जामठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर छायाचित्रात दिसत आहेत.

# संत रविदास जयंती नियोजन बैठक संपन्न



**बुलढाणा :** दि. १३ फेब्रुवारी २०२१ रोजी बुलढाणा येथील राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या, संगम चौक येथील कार्यालयामध्ये जगतगुरु संत रविदास महाराज यांची जयंती दि. २७ फेब्रुवारी २०२१ रोजी साजरी करण्यात येणार असून त्या संदर्भात मा. शा. पा. गवई साहेब यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न झाली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अमरावती विभागीय अध्यक्ष मा. प्रा. डी. आर माळी सर उपस्थित होते. तसेच जिल्हाध्यक्ष श्री भागवत तांदळे सर, जिल्हा सचिव श्री आत्माराम चांदोरे सर, श्री चिम सर, बाळासाहेब वानेरे, श्री काकडे साहेब, श्रीकृष्ण पानझाडे, श्री सुरडकर, श्री तुळशीरामजी परमेश्वर, कुणाल चांदोरे, श्री गणेश खनसरे सर व समाज बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना विनम्र आवाहन!

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक, अध्यक्ष माननीय बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली आपण आपल्या जिल्ह्यात, तालुक्यात, विभागात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असता. त्या उपक्रमांचे, कार्यक्रमांचे फोटो आणि बातम्या

adhikrutrcm@gmail.com

या ईमेलवर पाठवावेत. त्यांना नि:शुल्क प्रसिध्दी दिली जाईल.

हा उपक्रम महासंघाच्या प्रचार आणि प्रसारार्थ आहे याची आपण सर्व पदाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी आणि सहकार्य करावे, हि नम्र विनंती.

**संपादक : डॉ. शांताराम कारंडे**
९८२०१५८८८५

# महासंघाच्या वतीने संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त नियोजन बैठकीचे आयोजन

**मानवत प्रतिनिधी :** मानवत येथे दिनांक १ ७/०१/२०२१ रोज रविवारी सायंकाळी ठिक ५-३० वाजता मानवत येथील सांस्कृतिक सभागृहाच्या प्रांगणामध्ये राष्ट्रसंत श्री संत शिरोमनी गूरू रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त पूर्व नियोजन बैठकीचे आयोजन राष्ट्रीय चर्मकार महा संघाच्या वतीने करण्यात आले असून प्रमूख मार्गदर्शक मानवत नगर परिषदेचे नगराध्यक्ष मा. प्रा. एस.एन पाटील,मदनराव कांबळे, सुदामराव कांबळे,बाबासाहेब पानझाडे सर, माऊली शिंदे, निवृत्ती पतंगे नारायण पानझाडे, रमेशराव हाळणे, दत्तराव आधाटे सर, संकेत कांबळे सर, पांडूरंग नांदूरे, केरबा चांदणे, गोविंदराव फूलवरे, मनोहर कूरिल, मिय्यालाल कूरिल, रोहिदास पानझाडे, सकाहरी कावळे, आदीची या वेळी उपस्थीती राहणार असून या महत्व पूर्ण नियोजन बैठकिला सर्व समाज बांधवानी उपस्थीत राहून आपले अमूल्य विचार व्यक्त करावे. असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महा संघाच्या वतीने तालूकाध्यक्ष मुरलीधर ठोंबरे यांनी केले आहे.

सविस्तर वृत्त असे की, श्री संत शिरोमणी गुरु रविदासजी महाराज यांची ६६४ वी जयंती

महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार असून त्या संबंधीची पूर्व नियोजन बैठकीचे आयोजन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. या महत्व पूर्ण बेठकीला समाजातील प्रतिष्ठित मान्यवर या वेळी अनेक विषयावर मार्गदर्शन करणार असून आपले मार्गदर्शनही महत्वपूर्ण व अमूल्य असून दिनांक १७ / ०१ / २०२१ रोजी सायंकाळी ठिक ५-३० वाजता संपन्न होणाऱ्या नियोजन बैठकीला आपली उपस्थीती प्रार्थनीय आहे,

तरी या बैठकीला मानवत तालूक्यासह शहरातील चर्मकार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थीत राहून आपले विचार व्यक्त करून मार्ग दर्शन करावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मानवत तालूका व शहर शाखेच्या वतीने मानवत तालूका अध्यक्ष मूरलीधर ठोंबरे, विलास पतंगे हनूमान नांदूरे ज्ञानेश्वर पानझाडे नितिन हाळणे यांनी केले आहे.




**ऐसा चाहू राज मैं, जहाँ मिले सबन को अन्न!**
**छोटं-बडे सम् बसे, रविदास रहे प्रसन्न !!**

संत रविदास महाराज हे फक्त चांभारांचे संत नसुन समस्त बहुजनांचे संत होते. ते जर फक्त चांभारांचेच संत असते तर त्यांनी वरील दोह्यात सबन को मिले अन्न ऐवजी, चमार को मिले अन्न! असाच दोहा सांगितला असता.

ब्राम्हणांनी आमच्या सर्व मूलनिवासी - बहुजन संतांना जातीच लेबल लावून एका जातीपुरतच मर्यादित ठेवले.

संत रविदासांचे कार्य इतके महान होते की , वर्षभर जरी त्यांची जयंती साजरी केली तरी अपुरेच राहील.


बहुजनांनी १५ फेब्रुवारी पासून निरंतर एक महिना तरी आपल्या गावात - तालुक्यात व जिल्ह्यात ईतर आपले महापुरुषा सोबत संत रविदास जयंती साजरी करावी.



सर्व रविदास भक्तांना जयंतीच्या

**हार्दिक शुभेच्छा!**

# दि 'ग्रेट' ए. पी. जे. अब्दूल कलाम!



**आपल्यापैकी बऱ्याच जणांना विश्वास ठेवणे कठीण होईल. परंतु हे कलाम सरांचे सचिव श्री नायर यांनी लिहिले आहे. अविश्वसनीय आणि धक्कादायक माहिती वाचा. डी. पोधीगाई यांनी श्री पी. एम. नायर यांची मुलाखत प्रसारित केली. (निवृत्त आयएएस अधिकारी जे डॉ. अब्दुल कलाम सरांचे सचिव होते सर देशाचे राष्ट्रपती असताना.) भावनांनी ओथंबलेल्या आवाजामध्ये त्यांनी बोललेले मुद्दे मी थोडक्यात सांगतो.**

श्री नायर यांनी कलाम इफेक्ट नावाच्या पुस्तकाचे लेखन केले.

१. अनेक राष्ट्रांना भेट देणाऱ्या राज्य प्रमुखांना भेटवस्तू देण्याची प्रथा असल्याने डॉ कलाम जेव्हा परदेशात गेले तेव्हा त्यांना महागड्या भेटवस्तू मिळत असत. ही भेट नाकारणे हा देशाचा अपमान आणि भारतासाठी पेच ठरेल. म्हणून, परदेशातुन परत आल्यावर डॉ. कलाम यांनी भेटवस्तूंचे छायाचित्र काढायला सांगितले आणि नंतर कॅटलॉज केले आणि ते संग्रहात सुपूर्द केले त्यानंतर,त्यांनी त्यांच्याकडे पाहिलेच नाही. राष्ट्रपती भवन सोडताना मिळालेल्या भेटवस्तूंमधुन त्यांनी पेन्सिलही घेतली नाही.

२. २००२ मध्ये, डॉ. कलाम यांनी पदभार स्वीकारला त्या वर्षी, रमजान महिना जुलै-ऑगस्टमध्ये आला. राष्ट्रपतींनी इफ्तार पार्टीचे आयोजन करणे ही नेहमीची प्रथा होती. डॉ. कलाम यांनी श्री नायर यांना विचारले की त्यांनी आधीच चांगले आहार घेतलेल्या लोकांना पार्टी का आयोजित केली पाहिजे ? आणि त्यासाठी किती खर्च येईल हे शोधण्यास सांगितले. श्री. नायर यांनी सांगितले की यासाठी सुमारे रुपये बावीस लाख रू.खर्च येईल.

डॉ. कलाम यांनी त्याला काही निवडक अनाथाश्रमांना अन्न, कपडे आणि ब्लँकेटच्या रूपात दान करण्यास सांगितले. अनाथ आश्रमांची निवड राष्ट्रपती भवनमधील एका टिमवर सोडली गेली होती आणि त्यात डॉ.कलाम यांची कोणतीही भूमिका नव्हती.निवड झाल्यानंतर डॉ. कलाम यांनी श्री नायर यांना त्यांच्या खोलीत येण्यास सांगितले आणि त्यांना एक लाख रुपयांचा धनादेश दिला. ते म्हणाले की आपण त्याच्या वैयक्तिक बचतीतून काही रक्कम देत आहोत आणि ही माहिती कोणालाही दिली जाऊ नये. श्री नायर यांना इतका धक्का बसला की तो म्हणाला, सर, मी बाहेर जाऊन सर्वांना सांगेन. लोकांना माहित असावे की येथे असा मनुष्य आहे ज्याने फक्त सरकारचे पैसेच दान केले नाहीत तर तो स्वत: चे पैसेही देत आहे.

डॉ. कलाम हे मुस्लिम असूनही त्यांनी राष्ट्रपती असताना इफ्तार पार्टी केली नव्हती.

३. डॉ. कलाम यांना येस सर प्रकारचे लोक आवडत नाहीत.एकदा जेव्हा मुख्य न्यायाधीश आले आणि काही काळ डॉ. कलाम यांनी आपले मत व्यक्त केले आणि श्री. नायर यांना विचारले,आपण सहमत आहात? श्री नायर म्हणाले नाही सर, मी तुमच्याशी सहमत नाही.सरन्यायाधीश आश्चर्यचकित झाले आणि त्यांच्या कानावर विश्वास बसला नाही. एखाद्या नागरी सेवकास राष्ट्रपतींशी सहमत नसणे अशक्य होते आणि तेही इतके उघडपणे.

श्री. नायर यांनी त्यांना सांगितले की राष्ट्रपती नंतर त्यांच्याशी का सहमत नाहीत असा प्रश्न विचारतील? आणि जर दिलेले कारण तर्कसंगत असेल तर ते ९९% मत बदलतील.

डॉ. कलाम यांनी आपल्या नातेवाईकांना दिल्ली येथे येण्याचे आमंत्रण दिले आणि ते सर्व राष्ट्रपती भवनात राहिले. त्यांनी त्यांच्यासाठी जे पैसे भरले होते त्या शहराकडे जाण्यासाठी त्यांच्यासाठी एक बस आयोजित केली.कोणतीही अधिकृत कार वापरली गेली नव्हती. डॉ. कलाम यांच्या सूचनेनुसार त्यांचा सर्व मुक्काम आणि जेवणाची गणना केली गेली आणि त्यांनी भरलेले बिल २ लाखांवर आले.

या देशाच्या इतिहासात कोणीही केले नाही.

आता, क्लायमॅक्सची वाट पाहा, डॉ. कलाम यांचा मोठा भाऊ त्याच्याबरोबर संपूर्ण आठवडाभर खोलीत राहिला कारण डॉ. कलाम यांनी आपला भाऊ त्याच्याबरोबर राहावा अशी इच्छा व्यक्त केली.ते गेल्यावर डॉ. कलाम यांना त्या खोलीचे भाडेदेखील द्यायचे होते. कल्पना करा की एखाद्या देशाच्या राष्ट्राध्यक्ष ज्या खोलीत तो राहतो त्या घरासाठी भाडे देत आहे.

प्रामाणिकपणा हाताळण्यासाठी खूप जास्त मिळत आहे असा विचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हे कोणत्याही प्रकारे मान्य केले नाही !!!.

कलाम सर जेव्हा कार्यकाळ संपल्यावर राष्ट्रपती भवन सोडणार होते, तेव्हा प्रत्येक स्टाफ सदस्याने जाऊन त्यांना भेट दिली. श्री. नायर त्यांच्या जवळ गेले. ते पलंगावर बसले होते. आणि डॉ कलाम यांनी त्यांची पत्नी का आली नाही असे विचारले. एका अपघातामुळे ती पलंगावर असल्याचे नायर यांनी उत्तर दिले. दुसऱ्या दिवशी, श्री नायर यांनी आपल्या घराभोवती बरेच पोलिस पाहिले आणि काय झाले ते विचारले. ते म्हणाले की, भारताचे राष्ट्रपती त्यांच्या घरी त्यांच्या भेटीला येत होते. ते येऊन आपल्या बायकोला भेटले आणि काही वेळ गप्पा मारल्या. श्री नायर म्हणतात की, कोणत्याही देशाचे कोणतेही अध्यक्ष सरकारी सेवकाच्या घरी भेट देणार नाहीत आणि तेही अशा साध्या बहाण्याने. मला वाटलं मी तुम्हाला माहितीचा तपशील द्यावा कारण तुमच्यातील बऱ्याच जणांनी टेलिकास्ट पाहिली नसेल आणि त्यामुळे ते उपयोगी पडेल.

एपीजे अब्दुल कलाम यांचा धाकटा भाऊ छत्री दुरुस्तीचे दुकान चालवतो

कलाम यांच्या अंत्यसंस्कारावेळी श्री. नायर जेव्हा त्यांची भेट घेतली तेव्हा श्री. नायर व भाऊ यांच्याबद्दल आदर दर्शवताना त्याने त्यांच्या पायाला स्पर्श केला. अशी माहिती सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सामायिक केली जावी कारण मुख्य प्रवाहातील मीडिया हे दर्शविणार नाही.

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी मागे ठेवलेली मालमत्ता खालील प्रमाणे होती.

**६ अर्धी चड्डी (२ डीआरडीओ गणवेश)**
**४ शर्ट (२ डीआरडीओ गणवेश)**
**२५०० पुस्तके**
**१ फ्लॅट (त्याने दान केलेला आहे)**
**१ पद्मश्री**
**१ पद्मभूषण**
**१ भारतरत्न**
**१६ डॉक्टरेट**
**१ वेबसाइट**
**१ ट्विटर खाते**
**१ ईमेल आयडी**

त्यांच्याकडे कोणताही टीव्ही, एसी, कार, दागिने, शेअर्स, जमीन किंवा बँक बॅलन्स नव्हते. त्यांनी आपल्या गावाच्या विकासासाठी मागील ८ वर्षांची पेन्शन देखील दान केली होती.

ते खरे देशभक्त आणि खरे भारतीय होते

भारतरत्न डॉ. कलाम...हा देश कायम तुमचा ऋणी राहील.

**■ संकलन : मनोहर कटके**


काय ???



अधिकृत RCM ईमासिकाचे
वार्षिक सभासद व्हायचंय?
मग वाट कसली बघतायं? लगेच संपर्क साधा :
आर.सी.एम. प्रचार आणि प्रसार विभाग :
९८२०१५८८८५ / ७७२२०७९१२५